खे.ता.शि.प्र मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## वाणिज्य मंडळ (Commerce Association)

## २०२१-२२ / सत्र २

## अहवाल

दिनांक :- १०/०६/२०२२.

शैक्षणिक वर्ष 2021-22 च्या द्वितीय सत्रातील वाणिज्य मंडळाचे कामकाज पुढील पद्धतीने यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

वाणिज्य शाखेमध्ये प्रथम वर्ष वर्गामध्ये 264 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. तसेच द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 216 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे आणि तृतीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 107 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.

महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत पुढील काही उपक्रम घेण्यात आले.

शनिवार दिनांक १९ मार्च २०२२ रोजी व्यक्तिमत्व विकास या विषयावर एक दिवसीय. ऑनलाईन वेबिणार घेण्यात आले. सदर कार्यक्रमाची वेळ साली 11 ते दुपारी १२.३० पर्यंत होती. सदर कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने झूम च्या माध्यमातून घेण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते प्रा.डॉ. सतीश उबाळे ( Director of Matrix School of Management Studies) हे होते.सदर कार्याक्रमासाठी ८० विद्यार्थी उपस्थित होते.

शुक्रवार, दिनांक १ एप्रिल २०२२ रोजी एम.बी.ए. मध्ये करिअर च्या संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून S.N.G. Institute of Management and Research या संस्थेचे संचालक प्रा.वाळके सर हे होते. सदर कार्यक्रम हा तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला होता.

एप्रिल महिन्यामध्ये तृतीय वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांसाठी एक विद्यार्थी-एक झाड हा वृक्ष-रोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या घराच्या

आजूबाजूला आपल्या गावातच एक झाड लावण्यास सांगितले आणि त्याचा अहवाल विद्यार्थ्यांनी विभागामध्ये जमा केला. सदर उपक्रमाचा कालावधी हा एक महिना होता.सदर उपक्रमामध्ये तृतीय वर्ष वाणिज्य मधील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

वाणिज्य विभागामध्ये शुक्रवार दिनांक 3 जुन २०२२ रोजी विद्यार्थ्यांना विविध ज्ञान मिळावे आणि विविध कोर्स अल्प दरामध्ये करता यावे यासाठी स्पार्क मिंडा फौंडेशन तर्फे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या सवलतीबद्दल आणि कोर्स बद्दल मार्दर्शन करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते स्पार्क मिंडा फौंडेशनचे अधिकारी श्री. साहील सर हे होते. हा कार्यक्रम तीनही वर्गासाठी आयोजित केला होता.

सदर सत्रामध्ये वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत वरील उपक्रम घेण्यात आले.

वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत वरील सर्व उपक्रम हे महाविद्यालयाचे प्राचार्य आणि वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडले.

प्रा.अभिजीत बेंडाले
वाणिज्य मंडळ प्रमुख

प्राचार्य